शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचा पुरस्कार करणारे सायंदैनिक

प्राजक्त

संस्थापक व आद्य संपादक : स्व पुरुषोत्तम कुलकर्णी

आम्ही भिडे
नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान
(खाजगी वितरण)
अंक ऑक्टोबर २०२६
अंक क्र. ६८
Website : www.bhidekul.in
Email : office@bhidekul.in

वर्ष 53 अंक 200 कोल्हापूर ता. 29 ऑक्टोबर 2026 किंमत 4 रुपये * पाने 4+8 Postal Reg. No. KLR 136/24-26 Posted in Kolhapur RMS RNI NO. : M-6 (1457) / 70-RNI

२५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा



दि. २७ सप्टेंबर, २०२६ रोजी नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानची २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा पुणे येथील भिडे प्रतिष्ठानच्या स्वतःच्या वास्तूमध्ये संपन्न झाली. घटनेतील तरतुदीनुसार २०२६ ते २०३१ ह्या पाच वर्षांच्या कालावधी करिता विश्वस्त कार्यकारी मंडळाच्या सर्व ११ जागांसाठी विश्वस्तांची निवड झाली. निवडणूक कार्यक्रम आणि निवडणूक प्रक्रिया संदर्भात वार्षिक सर्वसाधारण सभेची पत्रिका सर्व आजीव सभासदांना पोस्टाने पाठविण्यात आल्या होत्या. निवडणूक प्रक्रिया राबविण्यासाठी घटनेप्रमाणे निवडणूक अधिकारी म्हणून श्री. शशिकांत वामन भिडे यांची नियुक्ती करण्यात आली. त्यानुसार वैध अकरा उमेदवारांची अंतिम यादी निवडणूक अधिकाऱ्यांनी जाहीर केली. घटनेतील तरतुदीनुसार एक वर्षासाठी दोन स्वीकृत सदस्यांची नेमणूक करण्यात आली. सभेमध्ये २०२५-२६ ह्या आर्थिक वर्षाचा ताळेबंद सादर करून तसेच अंदाजपत्रक, हिशोब तपासनीस मानधन, अहवाल मांडून सभेची मान्यता घेण्यात आली. २०२५ मध्ये भिडे प्रतिष्ठानने स्वतःची वास्तू खरेदी केली. सदर वास्तूचे उद्घाटन मोठ्या दिमाखात करावयाचे होते परंतु दुर्दैवाने त्याच सुमारास प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. शशिकुमार भिडे यांचे निधन झाल्यामुळे छोटेखानी आणि साधेपणाने कार्यक्रम करून भिडे प्रतिष्ठानचे माजी अध्यक्ष श्री. कुमार भिडे यांचे हस्ते सर्व विश्वस्तांच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले. सदर वास्तू सर्व भिडे मंडळींना पाहता यावी या करिता २५ वी वार्षिक सभा प्रतिष्ठानच्या पुणे कार्यालयामध्ये घेण्यात आली.

भिडे प्रतिष्ठानकडून आजपावेतो पोस्टाद्वारे पत्रव्यवहार केला जातो. परंतु प्रत्यक्षात आजकाल टपाल पाठविल्यानंतर विलंबाने मिळते किंवा मिळत सुद्धा नाही, म्हणजेच टपाल मिळण्याची खात्री देता येत नाही असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. मनुष्यबळ, वेळ आणि आर्थिक खर्च यांचा विचार करता आणि जलदगतीने माहिती आपल्यापर्यंत पोहोचविण्यासाठी डिजिटलमध्ये

(पान दोनवर)

भिडे कुल संमेलन
किहीम, अलिबाग २०२७
दि. ९ आणि १० जानेवारी, २०२७

- स्थळ : **अमनसारा भिडे रिट्रीट**
  किहीम बीच रोड, किहीम, अलिबाग ४०२ २०८
- वेळ : **शनिवार दि. ९ जानेवारी दुपारी ३ ते रविवार दि. १० जानेवारी सायंकाळी ५ पर्यंत.**

- **संमेलन शुल्क : प्रतिव्यक्ती रु. ६००/-**
  (चहा, नाष्टा, भोजन व डॉर्मेटरी निवासासह)

- **शनिवार दि. ९ जानेवारी २०२७**
  उद्घाटन आणि विशेष कार्यक्रम
- **रविवार दि. १० जानेवारी २०२७**
  आम्ही भिडे ६९ व्या अंकाचे प्रकाशन, विद्यार्थी गुणगौरव, ज्येष्ठांचे सत्कार, भिडे प्रतिष्ठानचे पुरस्कार वितरण आणि सांस्कृतिक कार्यक्रम.

दि. ९ आणि १० जानेवारी, २०२७ रोजी किहीम, अलिबाग येथे होणाऱ्या भिडे संमेलनासाठी बंधू-भगिनी व माहेरवाशीणींना आग्रहाचे सस्नेह निमंत्रण ! संमालन निमंत्रण पत्रिका भिडे ग्रुपवर, व्हॅटस् ॲप, फेवबुक, ई-मेल ह्या डिजिटल माध्यमाद्वारे पाठविण्यात येईल. ज्यांना पोस्टाद्वारे हव्या असतील त्यांनी दिलीप भिडे यांना ९६५७५४१२३६ या मोबाईलवर संपर्क करावा. तसेच पत्रिका **www.bhidekul.in** ह्या संकेत स्थळावर लवकर चउपलब्ध होईल.

(पान एक वरुन)

पत्रव्यवहार करणे ही काळाची गरज ओळखून टपालाने पत्र पाठविण्याबरोबरच डिजिटलद्वारे म्हणजे व्हॉटस्अप, ई-मेल, फेसबुक ह्या माध्यमांद्वारे सुद्धा भिडे प्रतिष्ठानकडून समस्त मंडळींशी तात्काळ संपर्क साधण्याच्या दृष्टीने तसा ठराव मांडून सभेची एकमताने मंजुरी घेऊन तरतूद करण्यात आली. अनेक वर्षे संस्थेचे कार्य करणारे श्री. प्रभाकरपंत भिडे, चिंतामणी भिडे आणि शंतनु भिडे ह्यांनी विश्वस्त पदामधून स्वच्छेने निवृत्ती घेतल्यामुळे तसेच नवनिर्वाचित विश्वस्तांचा प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. चंद्रकांत भिडे यांचे हस्ते सन्मान करण्यात आला. सभेचे सूत्रसंचालन सौ. सुप्रिया भिडे यांनी केले.

सोशल मिडियावर (उदा. फेसबुक, व्हॉट्सॲप इ.) 'आम्ही भिडे' वा तत्सदृश नावाने काही ग्रुप असतील तर सदर ग्रुप नित्युंदन गोत्रिय भिडे प्रतिष्ठानचे अधिकृत नाहीत, ह्याची कृपया नोंद घ्यावी.

आम्ही भिडे **अंक ६८ वा**

संपादक : श्री. प्रभाकर शंकर भिडे
कार्यकारी संपादक : श्री. दिलीप वासुदेव भिडे
संपादक मंडळ : ले. क. सुनिल भिडे, श्री. प्रदीप ज. भिडे, श्री. चिंतामणी भिडे, श्री. हेमंत भिडे, जळगाव, श्री. विनायक वि. भिडे, श्री. माधव पु. भिडे, राजेंद्र भिडे, दादर
सल्लागार मंडळ : सौ. सुप्रिया भिडे, सातारा, सौ. स्नेहल भिडे, ठाणे सौ. गौरी प्र. भिडे (डोंबिवली), श्री. शंतनु नि. भिडे, सौ. मेघना भिडे, डॉ. प्रतिभा भिडे
अक्षर जुळणी : सौ. विनीता डबीर

पत्रव्यवहारासाठी पत्ता

ले. क. सुनिल वासुदेव भिडे

१४२६, सदाशिव पेठ, नीलसदन ए-२०१, पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०

मो. ९६२३०१७४४४

मुंबई कार्यालय : **सौ. संपदा भिडे**
ए 503, श्रीसाई शारदा हौसिंग सोसायटी, भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम), मुंबई - 400028. मो. 9819951391

सूचना : आजीव सभासद वर्गणी, देणगी, जाहिरात इत्यादी स्वरूपात रक्कम ऑनलाईन ट्रान्स्फर करण्यासाठी खालील माहिती -

TJSB सहकारी बँक लि; सदाशिव पेठ शाखा, पुणे-३०.
नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान,
अकौंट नंबर - 018110100001294,
IFSC Code - TJSB0000018

विशेष सूचना - रक्कम ट्रान्स्फर केल्यावर दिलीप भिडे, पुणे यांना 9657541236 या क्रमांकावर किंवा office@bhidekul.in ह्या मेलवर कळवावे म्हणजे पावती पाठवली जाईल.

सहवेदना : भिडे कुलातील निधन झालेल्या ज्ञात-अज्ञात कुलबंधू, भगिनी आणि माहेरवाशिणींना भिडे प्रतिष्ठान श्रद्धासुमन अर्पण करीत आहे. **१) श्री. अरुण विनायक भिडे, दादर, मुंबई २) डॉ. शिवराम पांडुरंग भिडे, पुणे. ३) सौ. ऐश्वर्या अजित भिडे, पुणे. ४) श्री. श्रीराम महादेव भिडे, पुणे**

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान विवाह वाढदिवसाच्या शुभेच्छा !

ऑक्टोबर	श्री. संदीप व सौ. सुकृता भिडे, अंमळनेर	२५-१०-१५
	श्री. नारायण व सौ. लता भिडे, जबलपूर	२७-१०-८२
	श्री. दयानंद व सौ. शरयू कुंदर, मुलुंड	१४-१०-७५
नोव्हेंबर	श्री. शरदश्चंद्र व सौ. प्राची भिडे, पुणे	१८-११-८५
	श्री. जयराम व सौ. केतकी भिडे, सोलापूर	२५-११-८८
	श्री. अमोद व सौ. धनश्री भिडे, सांगली	२७-११-१८
	श्री. सिद्धार्थ व सौ. केतकी भिडे, सांगली	२८-११-१४
	श्री. नवीन व सौ. नीना भिडे, इंदोर	२५-११-८७
डिसेंबर	श्री. श्रीपाद व सौ. मृण्मयी भिडे, तळेगाव दाभाडे	०२-१२-०१
	श्री. श्रीकांत व सौ. जयश्री भिडे,	०८-१२-७४
	श्री. बळवंत व सौ. संध्या भिडे, अंमळनेर	३१-१२-८५
	श्री. कौस्तुभ व सौ. ऋचा जोशी, ठाणे	१९-१२-२०

जुलै ते सप्टेंबर २०२६ देणगीदार

१) श्री. अंकुश अतुल भिडे, पनवेल रु.१,००० आजीव सभासद
२) सौ. शर्मिला माधव करंदीकर (भिडे), पुणे रु. १००० आजीव सभासद

श्री. अंकुश अतुल भिडे, पनवेल यांना रु. १०,००० भिडे प्रतिष्ठानच्या शैक्षणिक निधीमधून आर्थिक मदत देण्यात आली.

सौ. शर्मिला माधव करंदीकर (भिडे), रा. पुणे यांना रु. १५,००० वैद्यकीय निधीतून वैद्यकीय आर्थिक मदत देण्यात आली.

'आम्ही भिडे' अंकातील माहितीचा वापर लेखकाच्या परवानगीशिवाय करू नये. लेखातील विचार वैयक्तिक आहेत. लेखात आढळणाऱ्या उणिवा, चुका यासंबंधी कोणत्याही प्रकारची कायदेशीर जबाबदारी संपादकांवर असणार नाही.

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला देणगी देऊन आपला वाढदिवस साजरा करा.

भिडे प्रतिष्ठानतर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

ऑक्टोबर

१. सौ. वृंदा अनिल भिडे, पुणे १
२. श्रीमती लक्ष्मी माधव भिडे, माभळे १
३. मयुरी मकरंद भिडे, सांगली १
४. सौ. रश्मी दिव्यांग भिडे, सुरत १
५. श्री. नितीन श्यामकांत भिडे, पुणे २
६. श्री. चंद्रशेखर श्रीधर भिडे, बोरिवली २
७. कु. दिव्या भालचंद्र भिडे, धसई २
८. सौ. स्वाती गिरीश भिडे, धायरी २
९. सौ. गिरीजा गणेश भिडे, गुहागर २
१०. सौ. वैदेही विजय भिडे, नागपूर २
११. श्री. गोपाळकृष्ण दत्तात्रय भिडे, पुणे ४
१२. श्री. श्रेयस सुबोध भिडे, पनवेल ४
१३. सौ. कोमल मोहन भिडे (पुरंदरे), डोंबिवली ६
१४. कु. प्राची संजय भिडे, माणगांव ७
१५. कु. प्रिती संजय भिडे, माणगांव ७
१६. श्री. मकरंद गोविंद भिडे, कल्याण ७
१७. कु. प्राजक्ता सुरेंद्र भिडे, ठाणे ७
१८. श्री. मकरंद गणेश भिडे, मिरज ७
१९. श्रीमती नंदिनी आनंद भिडे, पुणे ७
२०. प्राची सुबोध भिडे, संभाजीनगर ७
२१. सौ. जयश्री संजय भिडे, सांगली ७
२२. सौ. अश्विनी अनिरुद्ध भिडे, पनवेल ८
२३. सौ. केतकी सिद्धार्थ भिडे, सांगली ८
२४. श्री. विजय विष्णू भिडे, सांगली ८
२५. श्री. दीपक दिगंबर भिडे, डोंबिवली ८
२६. श्री. रविंद्र महादेव भिडे, विलेपार्ले ८
२७. श्री. शरद प्रभाकर भिडे, चिपळूण ९
२८. श्री. उमेश अनंत भिडे, मिरज ९
२९. सौ. अमृता आशिष भिडे, माभळे १०
३०. सौ. शर्वरी शरद भिडे, रत्नागिरी १०
३१. कु. आयुष प्रवीण भिडे, पुणे ११
३२. सौ. स्वराली गौरव भिडे, पुणे ११
३३. श्री. शेखर केशव भिडे, माभळे १२
३४. सौ. रश्मी अमेय भिडे, पुणे १२
३५. अनुजा माधव भिडे, डोंबिवली १२
३६. सौ. संध्या सुभाष भिडे, पुणे १२
३७. श्री. अनिरुद्ध विजय भिडे, पुणे १३
३८. श्री. गणेश माधव भिडे, पुणे १३
३९. शालिनी किशोर ठोंबरे (भिडे), पुणे १३
४०. सौ. अनुश्री अभिजित भिडे, भोर १४
४१. कु. ऋषभ विक्रम भिडे, हैद्राबाद १५
४२. श्री. रमेश महादेव भिडे, डोंबिवली १६
४३. श्री. रोहन सुनिल भिडे, पुणे १६
४४. श्रीमती प्रज्ञा वसंत भिडे, रत्नागिरी १७
४५. सौ. जान्हवी विवेक भिडे, रत्नागिरी १७
४६. सौ. माधवी प्रसाद भिडे, ठाणे १७
४७. सौ. अपर्णा शरद भिडे, सांगली १७
४८. श्री. श्रेयस सुभाष भिडे, कल्याण १७
४९. श्री. स्वप्निल विश्वनाथ भिडे, आडिवरे १७
५०. मिहीर माधव भिडे, डोंबिवली १८
५१. श्री. चैतन्य किशोर भिडे, इंदोर १८
५२. सौ. प्रियांका सुरेंद्र भिडे, ठाणे १९
५३. श्री. अमित रविंद्र भिडे, कल्याण १९
५४. श्री. मधुकर लक्ष्मण भिडे, मालाड १९
५५. श्री. अशोक रामचंद्र भिडे, दक्षिण कर्नाटक १९
५६. सौ. माधुरी मधुसुदन भिडे, मुंबई १९
५७. कु. सायली गिरीश भिडे, पुणे २०
५८. श्री. अमेय अरविंद भिडे, पुणे २१
५९. श्री. माधव काशिनाथ भिडे, मुंबई २१
६०. श्री. चिंतामण नरहर भिडे, पुणे २१
६१. सौ. सुरेखा सुरेंद्र भिडे, पुणे २१
६२. सौ. प्रिती प्रसन्नकुमार भिडे, पुणे २१
६३. श्री. हर्षवर्धन श्रीकृष्ण भिडे, पुणे २२
६४. सौ. संध्या बळवंत भिडे, पुणे २२
६५. सौ. सुप्रिया संजय भिडे, येरवडा २२
६६. श्री. धनंजय मुकुंद भिडे, पुणे २२
६७. सौ. स्मिता नरेंद्र भिडे, सुरत २२
६८. श्री. चारुदत्त प्रभाकर भिडे, माभळे २३
६९. श्री. सतीश शरश्चंद्र भिडे, ठाणे २३
७०. श्री. अतुल भालचंद्र भिडे, नाशिक २३
७१. कु. सुप्रिता प्रसन्न भिडे, मुंबई २४
७२. डॉ. मीनल महेश भिडे, पुणे २४
७३. श्री. सचिन बळवंत भिडे, अंमळनेर २५
७४. श्री. शंकर मोरेश्वर भिडे, भोर २६
७५. श्री. आशीर्वाद राजेंद्र भिडे, दादर २६
७६. सौ. शुभदा संजीव भिडे, वारजे २७
७७. डॉ. केदार गोविंद भिडे, माभळे २८
७८. सौ. नमिता नितीन भिडे, कल्याण २८
७९. सौ. मुग्धा प्रसाद भिडे, माभळे २८
८०. सौ. पल्लवी आशुतोष भिडे, भांडुप २८
८१. सौ. स्मिता श्रीधर भिडे, चिपळूण २९
८२. श्री. नितीन विश्वनाथ भिडे, दापोली २९
८३. श्री. माधव दत्तात्रय भिडे, गोवा २९
८४. श्री. मधुसुदन कृष्णाजी भिडे, मुंबई २९
८५. श्री. मिहीर नितीन भिडे, पुणे ३०
८६. श्री. बाळकृष्ण त्रिंबक भिडे, पुणे ३०
८७. समिरा शेखर भिडे, पुणे ३०
८८. श्री. अजित आनंद भिडे, पुणे ३१

नोव्हेंबर

१. श्री. विठ्ठल दत्तात्रय भिडे, डोंबिवली १
२. कु. धनंजय मुकुंद भिडे, बेळगांव १
३. सौ. ज्योती जगदीश भिडे, बोरिवली १
४. श्री. धनंजय काशिनाथ भिडे, खालापूर २
५. कु. नृपजा सुनिल भिडे, पुणे २
६. डॉ. संतोष शंकर भिडे, पुणे २
७. सौ. नीला नंदकुमार ताम्हनकर, सांगली २
८. श्री. राजेंद्र वासुदेव भिडे, डोंबिवली ३
९. सौ. सुलभा श्रीकृष्ण भिडे, पुणे ३
१०. कु. करुणा दीपक भिडे, डोंबिवली ३
११. सौ. अनुजा सौरभ भिडे, माभळे ३
१२. श्रीमती शैलजा शरद गोगटे, पुणे ३
१३. श्री. तेजस मधुसुदन भिडे, मुंबई ३
१४. सौ. विदुला दिनानाथ भिडे, ठाणे ४
१५. श्रीमती गिरिजा गणेश भिडे, पुणे ४
१६. सौ. विदुला विनायक भिडे, गुजराथ ४
१७. श्री. परेश प्रशांत भिडे, पुणे ५
१८. श्री. सतिश जनार्दन भिडे, गिरगांव ५
१९. सौ. वर्षा विलास भिडे, मालाड ६
२०. श्री. शार्दुल सतीश भिडे, पुणे ६
२१. सौ. शितल सतीश गांगल, गोरेगांव ७
२२. श्री. यश अनिल भिडे, पुणे ७
२३. श्री. प्रभाकर लक्ष्मण भिडे, पुणे ८
२४. सौ. सुवर्णरेखा आदित्य देवधर, पुणे ८
२५. श्री. संजीव केशव भिडे, पुणे ९
२६. सौ. वृषाली पंकज भिडे, कर्नाटक ९
२७. श्री. रवींद्र प्रभाकर भिडे, सांगली ९
२८. सौ. ऐश्वर्या पराग फडतरे (भिडे), पुणे १०
२९. श्री. संदीप बळवंत भिडे, पुणे ११
३०. श्री. अनिल महादेव भिडे, भोपाळ ११
३१. श्री. धुंडिराज दत्तात्रय भिडे, पंढरपूर ११
३२. श्री. गिरीश शरद भिडे, विलेपार्ले १२
३३. श्री. केदार सुभाष भिडे, मालाड १२
३४. सौ. वीणा सच्चिदानंद वेलणकर, पुणे १२
३५. सौ. शरयू दयानंद कुंदर, मुलुंड १२
३६. सौ. धनश्री धनंजय भिडे, पुणे १२
३७. श्री. सिद्धार्थ दत्तात्रय भिडे, सांगली १३
३८. सौ. संपदा धनंजय भिडे, वारजे १३
३९. श्री. सचिन श्रीकांत भिडे, पुणे १४
४०. सौ. अर्चना आनंद भिडे, माभळे १४
४१. कु. अश्विन अनिरुद्ध भिडे, सांगली १४
४२. श्री. श्रीपाद श्रीकांत भिडे, तळेगाव दाभाडे १५
४३. श्री. शरद प्रभाकर भिडे, रत्नागिरी १५
४४. सौ. शैलजा शरद भिडे, रत्नागिरी १५
४५. श्री. चंदन चिंतामण भिडे, पुणे १६
४६. सौ. अलका सुभाष भिडे, कल्याण १७
४७. सौ. कीर्ति शिरीष भिडे, पुणे १७
४८. कु. राजश्री माधव भिडे, पुणे १८
४९. श्री. प्रमोद श्रीधर भिडे, डोंबिवली १८
५०. श्री. चंद्रकांत शंकर भिडे, ठाणे १९
५१. सौ. शोभा शरद भिडे, पुणे १९
५२. श्री. प्रभाकर वासुदेव भिडे, डोंबिवली १९
५३. श्री. संजय आत्माराम भिडे, येरवडा १९
५४. सौ. अनुराधा अनंत भिडे, मिरज १९
५५. श्री. अमेय नरेंद्र भिडे, पुणे १९
५६. सौ. धनश्री धनंजय भिडे, वारजे १९
५७. श्री. तेजस राजाराम भिडे, अलिबाग २०
५८. श्री. अजित चिंतामणी भिडे, पुणे २०
५९. श्री. कौस्तुभ अनिरुद्ध भिडे, सांगली २१
६०. श्रीमती प्राजक्ता पूर्णचंद्र भिडे, चिंचवड २१
६१. सौ. विद्या विकास भिडे, सांगली २२
६२. श्री. सतीश केशव भिडे, विलेपार्ले २३
६३. कु. स्वप्नाली प्रसन्न भिडे, मुंबई २३
६४. श्री. केदार प्रभाकर भिडे, पुणे २३
६५. सौ. गायत्री कपिल भिडे, कोथरुड २३
६६. सौ. सुचेता मधुकर भिडे, रायगड २४

भिडे प्रतिष्ठानतर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

६७. कु. वैभवी अनिरुद्ध भिडे, धायरी २४
६८. श्री. अविनाश मधुकर भिडे, पुणे २५
६९. श्री. योगेश शरद भिडे, पुणे २५
७०. सौ. प्रिती विवेक पाटणकर, पुणे २५
७१. श्री. एस. ए. कृष्णा भिडे, कर्नाटक २५
७२. सौ. विद्या जितेंद्र भिडे, पुणे २५
७३. सौ. मंजिरी रामचंद्र भिडे, वारजे २५
७४. श्रीमती सविता नरेंद्र भिडे, पुणे २६
७५. श्री. सुनिल सुरेश भिडे, पुणे २६
७६. सौ. अनुश्री विवेक राजहंस (भिडे) पनवेल २६
७७. श्री. सुनिल शरद भिडे, पुणे २६
७८. सौ. मीरा गोपाळकृष्ण भिडे, कोथरुड २७
७९. श्री. केशव दत्तात्रय भिडे, दादर २८
८०. सौ. ऋचा अर्जुन ओगले (भिडे), सुरत २८
८१. सौ. मालिनी शरद भिडे, चिपळूण २९
८२. श्री. कपिल गोपाळकृष्ण भिडे, मिरज २९
८३. श्री. सुहास सुभाष भिडे, सोलापूर ३०
८४. श्री. गुरुनाथ श्रीधर भिडे, चिपळूण ३०
८५. कु. देवयानी नितीन भिडे, पुणे ३०
८६. कर्नल दामोदर भास्कर भिडे, पुणे ३०
८७. श्री. मधुसुदन वामन भिडे, माहीम ३०

डिसेंबर

१. सौ. लता वसंत भिडे, ठाणे १
२. श्रीमती ज्योत्स्ना शरद भिडे, पुणे १
३. डॉ. प्राची अनिरुद्ध भिडे, माहीम १
४. कु. जय प्रवीण भिडे, गोवा २
५. श्री. प्रदीप जनार्दन भिडे, डोंबिवली २
६. सौ. शिल्पा श्रीकृष्ण भिडे, मालाड २
७. सौ. शुभदा रामचंद्र भिडे, सांगली २
८. सौ. निकिता स्वप्निल फडणीस, डोंबिवली २
९. श्री. सुरेंद्र बळवंत भिडे, ठाणे ३
१०. श्री. गौरव शेखर भिडे, पुणे ३
११. श्री. पूर्णेश रमेश भिडे, डोंबिवली ३
१२. श्री. वीरेंद्र विश्वनाथ भिडे, पुणे ४
१३. कु. ऋतुजा गणेश भिडे, पुणे ४
१४. श्री. अविनाश वासुदेव भिडे, पुणे ५
१५. श्री. वामन नरहर भिडे, पुणे ५
१६. श्री. दिलीप जगन्नाथ भिडे, पुणे ५
१७. श्री. मिलींद हरिभाऊ भिडे, मिरज ५
१८. सौ. आकांक्षा उदयन भिडे, पुणे ५
१९. श्री. सदानंद यशवंत भिडे, कांदिवली ६
२०. श्री. विक्रम दिलीप भिडे, पुणे ६
२१. अर्चना आनंद काकतकर (भिडे), मुंबई ६
२२. सौ. केतकी प्रतिक भिडे, ठाणे ६
२३. सौ. अर्चना शिरीष भिडे, पुणे ९
२४. श्री. रोहित प्रकाश भिडे, डोंबिवली १०
२५. श्रीमती मोहिनी मंदार भिडे, पनवेल १०
२६. सौ. भार्गवी भालचंद्र भिडे, धसई १०
२७. श्री. भालचंद्र रावजी भिडे, धसई १०
२८. डॉ. सुभाष चिंतामण भिडे, सांगली १०
२९. श्री. अनिल निळकंठ भिडे, पुणे ११
३०. चि. अर्णव श्रेयस भिडे, पुणे ११
३१. चित्रा शंतनु कुंटे (भिडे), पुणे १२
३२. श्री. अभिजित प्रकाश भिडे, पुणे १२
३३. सौ. राधा राजीव भिडे, ठाणे १२
३४. श्री. महेश मोरेश्वर भिडे, पुणे १३
३५. सविता सुरेश भिडे, हुबळी १३
३६. सौ. कविता प्रवीण भिडे, पुणे १४
३७. श्री. अजय माधव भिडे, बोरिवली १४
३८. श्री. प्रशांत त्रिंबक भिडे, पुणे १५
३९. कु. प्रत्युषा प्रशांत भिडे, दादार १५
४०. सौ. विद्या विनायक भिडे, डोंबिवली १५
४१. श्री. आनंद भिडे, पुणे १५
४२. श्री. सुभाष वामन भिडे, मालाड १७
४३. श्री. आनंद लक्ष्मण भिडे, माभळे १७
४४. सौ. शिल्पा चंद्रशेखर भिडे, बोरिवली १७
४५. श्री. धनंजय भिडे, वारजे १७
४६. श्रीमती चित्रा चंद्रकांत करंदीकर, रत्नागिरी १८
४७. कु. अन्वित प्रवीण भिडे, पुणे १९
४८. कु. श्रेया अनिरुद्ध भिडे, माहीम १९
४९. कु. ऋग्वेद संजय भिडे, गोवा १९
५०. श्री. चैतन्य आनंद भिडे, नाशिक २०
५१. श्री. सुभाष विनायक भिडे, पुणे २०
५२. कु. श्रद्धा गिरीश भिडे, पंढरपूर २०
५३. सौ. सुरश्री चंदन भिडे, पुणे २१
५४. श्री. अनिरुद्ध मोरेश्वर भिडे, सांगली २१
५५. कु. स्वरांगी आशिष भिडे, माभळे २१
५६. सरोज अच्युत खरे (भिडे), कुळगांव २१
५७. कु. सर्वेश योगेश भिडे, मिरज २१
५८. श्री. श्रीकृष्ण विश्वनाथ भिडे, मालाड २२
५९. श्री. तेजस श्रीकृष्ण भिडे, मालाड २२
६०. कॅ. योगेशचंद्र देवदत्त भिडे, पुणे २२
६१. श्री. उदयन योगेशचंद्र भिडे, पुणे २२
६२. सौ. मेधा आनंद भिडे, पुणे २२
६३. सौ. गायत्री केदार भिडे, डोंबिवली २३
६४. श्री. परेश गोपाळ भिडे, कल्याण २३
६५. श्री. दिलीप रघुनाथ भिडे, मुंबई २४
६६. सौ. वंदना अरविंद भिडे, पुणे २४
६७. सौ. सीमा विजय गांगल, गोरेगांव २४
६८. श्री. राजस माधव भिडे, पुणे २४
६९. सौ. प्रज्ञा प्रभाकर भिडे, माभळे २४
७०. सौ. अर्चना संजय भिडे, मालाड २५
७१. श्री. गिरीश दत्तात्रय भिडे, पुणे २५
७२. श्री. दिलीप वासुदेव भिडे, पुणे २६
७३. श्री. नितीन दिनकर भिडे, कल्याण २६
७४. श्री. विक्रम विलास भिडे, २६
७५. श्री. विवेक मुकुंद भिडे, पवई २६
७६. श्री. अजय सुनिल भिडे, डोंबिवली २६
७७. श्री. गोविंद मुकुंद भिडे, डोंबिवली २७
७८. श्री. राजस नितीन भिडे, कल्याण २७
७९. श्री. प्रकाश गोपाळ भिडे, मिरज २७
८०. सौ. प्राची शरदश्चंद्र भिडे, पुणे २७
८१. श्री. हिमांशू वसंत भिडे, नागपूर २७
८२. साधिका रमेश भिडे, मुंबई २७
८३. श्री. संदीप शरद भिडे, पुणे २८
८४. श्री. रमेश पुरुषोत्तम भिडे, मुलुंड २८
८५. श्री. मुकुंद भिडे, मुलुंड २८
८६. श्री. चारुचंद्र चिंतामणी भिडे, पुणे २९
८७. सौ. विजयश्री मिलींद भिडे, पुणे २९
८८. श्री. आशुतोष शरद भिडे, भांडुप २९
८९. कु. जानकी अविनाश भिडे, नाशिक २९
९०. श्रीमती प्रियंवदा भिडे, दादर २९
९१. सौ. जानकी ओढेकर (भिडे), नाशिक २९
९२. सौ. शर्मिला प्रभाकर भिडे, पंढरपूर ३०
९३. सौ. मधुरा परेश भिडे, कल्याण ३१
९४. श्री. समीर चंद्रशेखर भिडे, बोरिवली ३१
९५. सौ. प्रेरणा चौरीकर (भिडे), पुणे ३१

अभिनंदन – सामगंध संस्थेचे संचालक आणि प्रसिद्ध गायक, वादक श्री. अनिरुद्ध ऊर्फ मंदार विश्वास भिडे, पनवेल यांना ऑल इंडिया रेडिओ, मुंबई आकाशवाणी यांच्याकडून सुगम संगीतातील 'ए'ग्रेड गायक म्हणून दर्जा मिळाला. त्याकरिता त्यांचे नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान व परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा आणि अभिनंदन ! श्री. भिडे यांनी अनेक भिडे कुल संमेलनांमध्ये दर्जेदार गाण्यांचे कार्यक्रम केले आहेत. तसेच त्यांना 'कला'पुरस्काराने सुद्धा सन्मानित करण्यात आले होते. त्यांचे वडील स्व. विश्वासराव यांचा गाण्याचा वारसा त्यांनी पुढे नेला आहे. पं. यशवंत देव आणि पं. नारायणराव बोडस तसेच वडील विश्वासराव आणि आई वृषाली यांचे मार्गदर्शन व आशीर्वाद आहेत. तसेच पत्नी सौ. अश्विनी यांचे प्रेरणेने हा प्रवास सुखकर झाला असेही ते सांगतात. श्री. मंदार यांना भविष्यामध्ये उत्तम यश मिळो, ही सदिच्छा !



श्री. अनिरुद्ध भिडे

विद्यार्थी गुणगौरव, पुरस्कार आणि ज्येष्ठांचे सत्कार याबाबत निवेदन

दि. ९ आणि १० जानेवारी २०२७ रोजी अमनसारा भिडे रिट्रीट, किहीम बीच रोड, किहीम, अलिबाग - ४०२ २०८ येथे होणाऱ्या भिडे कुलसंमेलनात विद्यार्थी गुणगौरव, ज्येष्ठांचा सत्कार आणि पुरस्कार वितरण सभारंभ संपन्न होणार आहे. खाली दिलेल्या गटातील निकषांनुसार माहिती **दि. २५ नोव्हेंबर,२०२६** पर्यंत आयकार्ड फोटोसह खालील पत्त्यावर पाठवावी. ● **सौ. मेघना आशिष भिडे**, (प्रमुख विद्यार्थी गुणगौरव योजना), **प्रयेजा सिटी, बिल्डिंग नं. सी/३, फ्लॅट नं. ३०१, सिंहगड रोड, वडगांव बुद्रुक, शरद हॉस्पिटलजवळ, पुणे - ४११ ०४१. फोन नं. ८६६८५७७१९७ किंवा ८९८३३४५५१७. e-mail : bhidemeghana3@gmail.com**

– विशेष सूचना –

१) विद्यार्थी गुणगौरव योजनेचा फॉर्म याच अंकात दिलेला आहे. त्याची झेरॉक्स प्रत उपयोगात आणली तरी चालेल किंवा आपल्या वेबसाईटवरून तो फॉर्म डाऊनलोड करून घ्यावा. २) अपूर्ण माहितीचा विचार केला जाणार नाही. ३) एकापेक्षा जास्त विद्यार्थ्यांची माहिती पाठवायची असल्यास या फॉर्मची झेरॉक्स प्रत उपयोगात आणावी. ४) १० वी शालांत आणि १२ वी उच्च माध्यमिक शालांत गुणपत्रिकेची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे. न जोडल्यास त्याचा विचार होणार नाही. ५) पारितोषिकासाठी/पुरस्कारासाठी/सत्कारासाठी निवड झालेल्यांना पत्राने किंवा दूरध्वनीद्वारे संपर्क करून कळविले जाईल. त्याकरिता आपला संपर्क क्रमांक तसेच आयकार्डसाईज फोटो देणे आवश्यक आहे. ६) पुरस्कारासाठी आपले नामांकन गटानुसार दिलेल्या निकषांप्रमाणे पाठवावे आणि त्या संबंधीच्या झेरॉक्स प्रती जोडाव्यात. ७) ज्येष्ठांच्या सत्काराकरिता आपले नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, शिक्षण, व्यवसाय/नोकरी, सामाजिक कार्य व उल्लेखनीय कामगिरी, पारितोषिके इत्यादी माहिती कोऱ्या कागदावर आयकार्ड फोटोसह लिहून पाठवावी. ८) विद्यार्थी गुणगौरव योजनेच्या गटातील निकषांनुसार २०२५-२६ या वर्षातील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी/विद्यार्थिनींनी माहिती पाठवावी.

गट पहिला – ५ वी व ८ वी च्या स्कॉलरशिप परीक्षेत यश मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी (स्कॉलरशिप परीक्षेच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक.)

गट दुसरा – ५ वी ते ९ वी पर्यंतच्या वार्षिक परीक्षेत सर्व तुकड्यांत प्रथम क्रमांक मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी. मुख्याध्यापकांचे प्रमाणपत्र व गुणपत्रिकेची सत्यप्रत जोडणे आवश्यक.

गट तिसरा – दहावीच्या शालांत परीक्षेत ८०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी.

गट चौथा – १० वी च्या शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून यशस्वी होणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी. श्रीमती प्रियंवदा श्रीपाद भिडे, प्रभादेवी, मुंबई पुरस्कृत (कै. श्रीपाद सखाराम भिडे यांचे स्मरणार्थ)

गट पाचवा – १२ वी उच्च माध्यमिक परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून यशस्वी होणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी. कै. डॉ. सौ. शुभदा चारुचंद्र भिडे, सांगली पुरस्कृत (कै. के. वि. तथा दादूकाका भिडे, सांगली यांचे स्मरणार्थ)

गट सहावा – १२ वी उच्च माध्यमिक परीक्षेत कोकण विभागातून सर्वाधिक गुण मिळवणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी. श्रीमती मंजिरी माधव भिडे, पुणे पुरस्कृत (कै. माधव उर्फ नंदू दत्तात्रय भिडे, माभळे, स्मरणार्थ)

गट सातवा – १२ वी उच्च माध्यमिक परीक्षेत शास्त्र शाखेत ८०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे, कला शाखेत ६०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे आणि वाणिज्य शाखेत ७५% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी.

गट आठवा – १२ वी उच्च माध्यमिक परीक्षेत शास्त्र (सायन्स) विषयात सर्वाधिक गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनीसाठी श्री. सतीश दत्तात्रय भिडे, पुणे पुरस्कृत त्यांचे आई, वडील अनुक्रमे कै. सुधा आणि कै. दत्तात्रय दामोदर भिडे यांचे स्मरणार्थ पारितोषिक.

गट नववा – १० वी शालांत परीक्षेत मराठी विषयात सर्वाधिक गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी. श्री. बळवंत दत्तात्रय भिडे, अंमळनेर (कै. सिंधू विनायक भिडे यांचे स्मरणार्थ).

गट दहावा – १० वी शालांत परीक्षेत संस्कृत विषयात सर्वाधिक गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी. कै. जनार्दन कृष्णाजी भिडे विलेपार्ले, मुंबई पुरस्कृत.

गट अकरावा – १० वी शालांत परीक्षेत इंग्रजी विषयात सर्वाधिक गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी. (सौ. स्नेहा रमेश आपटे (भिडे) पुरस्कृत, त्यांचे वडील (कै. दत्तात्रय विनायक भिडे अंमळनेर यांचे स्मरणार्थ).

गट बारावा – १० वी शालांत परीक्षेत गणित विषयात सर्वाधिक गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी डॉ. श्रीमती वसुधा विद्याधर भिडे, पुणे पुरस्कृत त्यांचे पती कै. विद्याधर गंगाधर भिडे यांचे स्मरणार्थ भास्कराचार्य पारितोषिक.

गट तेरावा – संगीत, नृत्य, नाट्य, गायन, वक्तृत्व व क्रीडा अशा विषयात विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनी. सदर प्राविण्य कुठल्या स्तरावर मिळविले आहे याची माहिती व प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

गट चौदावा – विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी मदत योजना. इरावती ट्रस्ट, दादर, मुंबई यांच्या प्रमुख सुमित्रा मधुसुदन भिडे यांनी कै. त्रिंबक राजेश्वर भिडे आणि कै. जानकीबाई त्रिंबक भिडे यांच्या स्मरणार्थ पुरस्कृत केलेली विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी मदत योजना खालीलप्रमाणे –

भिडे कुलोत्पन्नातील कोणत्याही गुणवान, अभियांत्रिकी किंवा आर्किटेक्ट शाखेत शिक्षण घेत असलेल्या, भिडे कुलातील विद्यार्थी/विद्यार्थिनीला दरवर्षी साहाय्य देण्यासाठी पारितोषिक/मदतीची योजना आहे.

गट पंधरावा – श्री. प्रदीप वासुदेव भिडे व डॉ. शीला प्रदीप भिडे दिल्ली पुरस्कृत गरजू व गुणवत्ताप्राप्त शालेय अथवा महाविद्यालयीन

*****

७५ वर्षे किंवा त्यावरील सत्कारार्थी ज्येष्ठ कुलबंधू/भगिनी/माहेरवाशिणींनी फोटोसह माहिती पाठवावी.

विद्यार्थी गुणगौरव योजना फॉर्म - २०२७

वडील/आई

आजीव सभासद क्रमांक _____

(विद्यार्थ्याने संपूर्ण माहिती स्वतच्या हस्ताक्षरात भरावी)

१) संपूर्ण नाव _____

२) जन्म दिनांक _____ जन्म ठिकाण _____

३) आजपर्यंत झालेला अभ्यासक्रम _____

_____

४) सध्या शिकत असलेल्या शिक्षण संस्थेचे संपूर्ण नाव व पत्ता _____

_____

६) विद्यार्थ्यांच्या वडिलांचे संपूर्ण नाव व नोकरी/व्यवसाय करीत असल्यास तेथील हुद्दा व पूर्ण पत्ता _____

_____

_____ दूरध्वनी/मोबाईल _____

७) विद्यार्थ्याची आई नोकरी/व्यवसाय करीत असल्यास तेथील हुद्दा व पूर्ण पत्ता _____

_____

_____ दूरध्वनी/मोबाईल _____

८) अ) विद्यार्थ्याच्या पालकांचे नाव व पूर्ण पत्ता _____

_____

_____ दूरध्वनी/मोबाईल _____

ब) पालकाचे अर्जदार विद्यार्थ्याशी नाते _____

९) पत्रव्यवहाराचा पत्ता _____

_____

१०) कुठल्या गटातील गुणगौरव योजनेसाठी आपण माहिती सादर करीत आहात ? _____

११) सोबत जोडलेल्या प्रमाणपत्रांचा तपशील _____

१२) विद्यार्थी/विद्यार्थिनीचे बँक पासबुकाप्राणे पूर्ण नांव (इंग्रजीध्ये) _____

_____

दिनांक **विद्यार्थ्याची स्वाक्षरी**

(वडिलांनी/पालकाने भरावयाची माहिती)

१) अर्जदाराच्या पालकांचे आणि त्याच्या कुटुंबातील इतर सर्व व्यक्तींचे एकूण वार्षिक उत्पन्न : रुपये _____

२) विद्यार्थी गुणगौरव योजनेअंतर्गत आपल्या मुलाचा/मुलीचा विचार करायचा असेल तर त्यासाठी आपण प्रतिष्ठानचे आजीव सदस्य असणे आवश्यक आहे याची कृपया नोंद घ्यावी. आजीव सदस्य नसलेले आजीव सदस्य होऊ शकतात. सदस्य होण्यासाठी भरावयाची रक्कम खालीलप्रमाणे आहे.

* आश्रयदाता : रु. १०,०००/- * हितचिंतक : रु. ५,०००/- * आजीव : रु. १,०००/-

पालकाची स्वाक्षरी

पालकांचे नाव _____

पूर्ण पत्ता _____

दूरध्वनी क्रमांक/मोबाईल _____

दिनांक सभासद क्रमांक

विशेष सूचना १) माहिती सुवा अक्षरात संपूर्ण भरून दि. २५ नोव्हेंबर, २०२६ पूर्वी पोहोचेल अशा बेताने खालील पत्त्यावर पाठवावी.

• **सौ. मेघना आशिष भिडे, (प्रमुख विद्यार्थी गुणगौरव योजना), e-mail : bhidemeghana3@gmail.com**

प्रतिष्ठानचे पुरस्कार - २०२७

समस्त भिडे कुलबंधु/भगिनी आणि माहेरवाशिणींकरिता

भिडे प्रतिष्ठानकडून भिडे कुलसंमेलनात खालील पुरस्कार देण्यात येतात. त्याकरिता खाली दिलेल्या निकषानुसार आपले नामांकन, पूर्ण नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, शिक्षण, कौटुंबिक माहिती आत्तापर्यंत मिळालेल्या पुरस्कारासंबंधी माहिती व त्याच्या सत्यप्रति (झेरॉक्स) व **आपल्या आयकार्ड साईज फोटोसह खालील पत्त्यावर दि. २५ नोव्हेंबर, २०२६ पर्यंत पाठवावेत.**

सौ. मेघना आशिष भिडे, प्रयेजा सिटी, बिल्डिंग नं. सी/३,
फ्लॅट नं. ३०१, सिंहगड रोड, वडगांव बुद्रुक,
शरद हॉस्पिटलजवळ, पुणे - ४११ ०४१.
e-mail : bhidemeghana3@gmail.com किंवा
dilip.bhide15@gmail.com
फोन नं. ८६६८५७७१९७ किंवा ८९८३३४५५१७.

नामांकन देणारी व्यक्ती स्वत: किंवा त्याच्या नातेवाईकांनी वरील माहिती पाठविली तरी चालणार आहे. तसेच पुरस्कार स्वीकारणारी व्यक्ती स्वतः उपस्थित राहणे अपेक्षित आहे.

पुरस्काराचे स्वरूप : शाल, श्रीफळ, प्रशस्तिपत्रक व रोख रक्कम इ.

१) **साहस किंवा क्रीडा पुरस्कार अथवा सामाजिक कार्य पुरस्कार –** भिडे कुटुंबातील साहसीवृत्ती किंवा क्रीडा क्षेत्रामध्ये अथवा सामाजिक कार्य करणाऱ्या भिडे कुलोत्पन्न व्यक्तीस हा पुरस्कार दिला जातो. (कै. श्रीकृष्ण भिडे आणि कै. रामचंद्र भिडे स्मरणार्थ श्री. शैलेश आणि श्री. प्रसाद भिडे पुरस्कृत)

२) **'माझी आई' पुरस्कार –** भिडे कुलोत्पन्नातील गृहिणी, जेष्ठ स्त्री, तसेच अल्प उत्पन्न व प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जाऊन मुलांकरीता किंवा स्वतःच्या कुटुंबाकरीता विशेष कार्य करणारी स्त्री. श्री. रविंद्र रावजी भिडे, कल्याण पुरस्कृत त्यांच्या मातोश्री कै. सुशिला रावजी भिडे ह्यांचे स्मरणार्थे

३) **'आपली सून' पुरस्कार –** सुसंस्काराचा वारसा सतत पुढे नेण्याचे कार्य करणारी किंवा विशेष प्राविण्य अथवा विशेष पारितोषिक मिळालेली किंवा समाज कार्यात अग्रेसर असणारी किंवा अध्यात्मिक क्षेत्रात प्रचारकार्य करणारी किंवा विशेष लेखन करणारी किंवा प्रतिकूल परिस्थितीला तोंड देऊन मुलांसाठी, कुटुंबासाठी विशेष धडपड करणारी असावी. (सौ. मेधा उर्फ अनुराधा अविनाश भिडे, मिरज पुरस्कृत)

४) **'कला' पुरस्कार –** संगीत, नाटक, सिनेमा किंवा इतर कला क्षेत्रातील काम करणारी खास भिडे व्यक्ती असावी. (श्री. कुमार आणि कै. वसंत विष्णू भिडे, सांगली पुरस्कृत, यांचे बंधू कै. सुभाष विष्णू भिडे, सांगली यांचे स्मरणार्थ)

४) **उद्योजक पुरस्कार –** लघुउद्योजक किंवा नव्याने सुरू केलेला व्यवसाय, उद्योग धडाडीने, कष्टाने आणि प्रतिकूल परिस्थितीत सुद्धा नेटाने व्यवसाय वृद्धी करणाऱ्या तरुण भिडे व्यक्तीस हा पुरस्कार दिला जातो. (श्री. कुमार विष्णू भिडे, सांगली पुरस्कृत यांचे वडील कै. विष्णू विनायक तथा अण्णासाहेब भिडे, सांगली यांचे स्मरणार्थ)

६) **आदर्श कार्यकर्ता पुरस्कार –** भिडे कुलोत्पन्नामधील पुरस्कार स्वीकारणारी व्यक्ती प्रतिष्ठानचे कार्य करणारी आणि कोणत्याही वयाची असावी, हा पुरस्कार कै. दामोदर (दामुकाका) केशव भिडे, डोंबिवली यांचे स्मरणार्थ त्यांची कन्या सौ. नेहा सातर्डेकर-भिडे, डोंबिवली पुरस्कृत.

७) **वैदिक पुरस्कार –** पौरोहित्य अथवा वेदविद्या शिकणाऱ्या विद्यार्थी अथवा विद्यार्थिनीस किंवा कीर्तन शिकणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस हा पुरस्कार दिला जाईल. ही व्यक्ती भिडे कुलातील असावी. (कै. अहिताग्नी विश्वनाथ नारायण आणि श्रीमती दुर्गाबाई भिडे यांचे स्मरणार्थ त्यांचे पुत्र कै. वामन वि. भिडे आणि कै. सुमती वा. भिडे, पुणे पुरस्कृत.)

८) **संस्कृत पुरस्कार –** संस्कृत विषय घेऊन डॉक्टरेट (पीएच.डी.) किंवा एम.ए. करणाऱ्या पुरुष अथवा स्त्री व्यक्ती तसेच भिडे कुलातील असावी. (कै. डॉ. विद्याधर विश्वनाथ भिडे ह्यांचे स्मरणार्थ त्यांचे बंधू कै. वामन विश्वनाथ भिडे आणि कै. सुमती वा. भिडे, पुणे पुरस्कृत.)

९) **माहेरचा मान –** दरवर्षी भिडे कुल संमेलनामध्ये माहेरवाशिणींचा सन्मान व्हावा ह्यादृष्टीने कै. शशीताई मुरलीधर घुले, पुणे पुरस्कृत आणि त्यांचे आई-वडील कै. सरस्वती व कै. भालचंद्र भिडे यांचे स्मरणार्थ 'माहेरचा मान' १५ व्या भिडे कुलसंमेलनापासून दरवर्षी देण्यात येतो. पुरस्कर्त्यांनी देणगी दिलेल्या व्याजातून हा सन्मान दिला जातो.संमेलनामध्ये उपस्थित असणाऱ्या सर्व भिडे माहेरवाशिणींमधून सोडतीद्वारे (ड्रॉ पद्धतीने) याची निवड केली जाईल.



अभिज्ञान, पुणे पुरस्कृत अभंग लेखन हस्ताक्षर स्पर्धेमध्ये श्री. ऋषिकेश गजानन भिडे, बारामती ह्यांना हस्ताक्षर स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक नुकताच प्राप्त झाला. श्री. ऋषिकेश यांचे भिडे प्रतिष्ठान आणि परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा !

*****



डॉ. चैताली भिडे, रा. नेरळ यांना अ.भा. प्रतिभा महासंमेलन, शिर्डी यांचे तर्फे नारी शक्ती पुरस्कार तसेच ए.डी. फाउंडेशनकडून आदर्श महाराष्ट्ररत्न, नालंदा फाउंडेशनकडून सह्याद्रीरत्न, इत्यादी अनेक पुरस्कार २०२६ ह्यावर्षी प्राप्त झाले. डॉ. चैताली ह्या कवयित्री, लेखिका असून निसर्गोपचार व योगशास्त्र क्षेत्रातील अनुभवी तज्ज्ञ व मार्गदर्शक आहेत. वैद्यकीय क्षेत्रामध्ये कार्य करून साहित्यामध्ये सुद्धा आपल्या प्रतिभेचा ठसा उमटविणारे दुर्मिळ असतात. त्यांना भिडे प्रतिष्ठान व परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा आणि अभिनंदन !

'अल निनो' आणि 'ला नीना'

– अक्षय अनंत भिडे,
पुणे

हवामान शास्त्राचा अभ्यास करत असताना किंवा सामान्यतः वर्तमानपत्रांमधून हवामानाचे अंदाज वाचत असताना आपल्या वाचनात हल्ली दोन शब्द वारंवार येतात. ते म्हणजे 'अल-निनो' आणि 'ला-नीना'. ह्या दोन शब्दांचा पुनरुच्चार हा भारतीय मान्सूनच्या संदर्भात केला जातो. तर नक्की हे अल-निनो आणि ला-नीना हे प्रकरण आहे तरी काय आणि त्याचा आपल्या भारताशी कसा संबंध येतो हे प्रस्तुत लेखामध्ये जाणून घेऊया.

आपण वर वाचलेले दोन्ही शब्द हे हवामानाच्या एका वेगळ्या प्रकाराशी निगडित आहेत जे प्रशांत (पॅसिफिक) महासागरात घडतात. प्रशांत महासागर हा सर्वात मोठा महासागर असून या महासागराच्या पूर्वेला उत्तर अमेरिका आणि दक्षिण अमेरिका आणि पश्चिमेला न्युझिलंड, ऑस्ट्रेलिया आणि आशियाचा पूर्वेकडील भाग आहे. नेहमीच्या वर्षामध्ये म्हणजेच जेव्हा हे दोन्ही बदल नसताना, प्रशांत महासागरात हवामानाची सामान्य स्थिती असते. म्हणजेच व्यापारी वारे (Trade winds) हे पूर्वेकडून (पेरू, दक्षिण अमेरिका ह्या भागाकडून) पश्चिमेकडे (न्यूझिलंड, ऑस्ट्रेलिया या भागाकडे) वाहत असतात. व्यापारी वारे वाहत असताना ते प्रशांत महासागरातील मध्याचा भाग (हा तुलनेने उष्ण असतो) हा आपल्या सोबत हळूहळू पश्चिमेला ढकलतात. ह्यामुळे काही कालखंडानंतर पश्चिमेला उष्ण भाग आणि परिणामी पूर्वेला थंड भाग तयार होतो. आता जलचक्राच्या नियमानुसार पश्चिमेचा भाग उष्ण असल्याने तिथे बाष्प वाढते आणि ढग तयार होऊन लागून पाऊस पडतो. त्यानंतर हळूहळू हे ढग वातावरणाच्या 'Troposphere' पर्यंत जाऊन पोहोचतात आणि नंतर त्यामधील बाष्प कमी होते आणि ते वाऱ्यांच्या रूपाने पुन्हा पूर्वेकडे येतात. हे चक्र नेहमी सामान्यतः चालू असते.

आता ज्या वर्षी व्यापारी वारे हे तुलनात्मकरित्या कमी जोराने वाहत असतात त्या वेळी साहजिकच प्रशांत महासागरातील उष्ण भाग हा इतर वाऱ्यांमुळे हळूहळू पश्चिमेकडे न सरकता तो पूर्वेला सरकू लागतो. त्यामुळे हे चक्र उलट होऊ लागते आणि थंड भाग हा पश्चिम बाजूला जातो आणि उष्ण भाग पूर्वेला सरकू लागतो. ह्यामुळे पेरू, दक्षिण अमेरिका ह्या भागात नेहमीपेक्षा फार जास्त प्रमाणात पाऊस होतो तर पश्चिम भागात अतिशय विरळ पाऊस होतो. त्यामुळेच भारत हा प्रशांत महासागराच्या पश्चिमेला असल्याने भारताला सुद्धा ह्याचा परिणाम म्हणून अतिशय कमी पाऊस लाभतो. ह्या परिणामास 'अल-निनो' असे संबोधतात. हा परिणाम प्रथम पेरू मधील मासेमार लोकांच्या लक्षात आला आणि तिथे स्पॅनिश भाषिक जास्त असल्याने त्यांनी ह्याला 'EI-Nino' म्हणजे 'लहान मूल' किंवा 'ख्रिस्ताचं-मूल' असं नाव दिलं. आता आपण एक लक्षात घेतलं पाहिजे की अल-निनो हा परिणाम ज्या प्रदेशाच्या बाजूला थंड भाग असतो, प्रशांत महासागराचा उष्ण भाग असतो त्या भागाला म्हणतात. तर ह्याच्या उलट बाजूला म्हणजेच ज्या बाजूला प्रशांत महासागराचा थंड भाग असतो त्या भागात दिसणाऱ्या परिणामाला 'ला-नीना' असे म्हटले जाते. ला-नीनाचा परिणाम म्हणजे त्या भागात पावसाचे प्रमाण कमी होणे हा होतो. कधी कधी ला-नीनाच्या वेळी थंड भाग हा अधिक जास्त थंड होतो आणि त्याचा परिणाम म्हणून पाण्याचा उष्ण भाग वर तर थंड भाग महासागराच्या अधिक खोलवर जातो. यामुळे सुद्धा तापमानातील कमी आणि जास्त प्रकारचे भाग तयार होऊन पावसावर परिणाम होतो. ला-नीनाचे नामकरण हे सुद्धा स्पॅनिशमध्येच आणि अल-नीनोच्या उलट म्हणजे 'लहान मुलगी' असे केलेले आहे !

अल-निनो आणि ला-नीना हे एका मोठ्या चक्राचे लहान असे भाग आहेत. ह्या चक्राला 'ENSO' म्हणजेच 'E-Nino and Southern Oscillation' असे संबोधले जाते. अल-निनो (उष्ण परिणाम) आणि ला-नीना (थंड परिणाम) हे आता जागतिक हवामानाच्या अभ्यासात स्थिरावलेले आहेत. त्यांची वारंवारता ही ४.५ वर्षे इतकी आहे. तरी सुद्धा ते कमीत कमी २ वर्षे तर जास्तीत जास्त १० वर्षे इतक्या कालखंडाने होऊ शकतात. हे दोनही परिणाम हवामानातील सर्वात मोठ्या बदलांपैकी एक असून ह्यांचा परिणाम म्हणून साधारण अर्ध्या पृथ्वीवरील वातावरणावर ह्याचा परिणाम होतो. भारतामध्ये हिवाळ्यात अल-निनोचा परिणाम हा उष्ण वातावरणात होतो तर उन्हाळ्याच्या काळात ह्याचा परिणाम हा कमी पाऊस आणि कोरडा दुष्काळ असा होतो. ह्या उलट ला-नीनाचा परिणाम हा भारतात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्यात होतो. तर मग आता इथून पुढे 'अल-निनो' आणि 'ला-नीना' हे हवामानशास्त्रातील शब्द कुठेही ऐकलेत तर तुम्हाला नवीन काही वाटायला नको !

अभिनंदन -

शिक्षण विवेक आयोजित काव्य अभिवाचन स्पर्धेमध्ये कु. वरदा जोशी, पुणे इ. २ री, हिला सर्वोत्कृष्ट पारितोषिक आणि धार्मिक पाठांतर स्पर्धेमध्ये प्रशस्तिपत्रक प्राप्त झाले. कु. वरदा ही खजिनदार श्री. माधव भिडे यांची नात आहे. तिचे हार्दिक अभिनंदन आणि शुभेच्छा !



कु. वरदा जोशी

अभिनंदन -

कसबा विधानसभा, पुणे प्रभाग २५ च्या उपाध्यक्षपदी श्री. मिलींद पुरुषोत्तम भिडे, पुणे यांची निवड झाली. श्री. मिलींद अनेक सामाजिक संस्थांमध्ये कार्यरत असून भिडे प्रतिष्ठानमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असतो. भिडे प्रतिष्ठानतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन आणि शुभेच्छा !



श्री. मिलींद भिडे

मर्यादा

– रमेश रामचंद्र भिडे, डोंबिवली

प्रत्येक वाहनाच्या वेगाला सुद्धा मर्यादा असते. मर्यादेचा उपमर्द झाला की अनंत संकटांना तोंड देणे प्राप्त होते. जीवनात काही गोष्टी कोणत्या स्थळी, कोणत्या वेळी आणि कुणाबरोबर शिकायला मिळतील याचं भविष्य कुणीही सांगू शकत नाही. याचं संपूर्ण नियोजन नियतीने तुम्ही जन्माला यायच्या अगोदरच केलेले असते. माझे एक स्नेही होते आणि ते त्या काळात गोरेगाव मुक्कामी राहात असत. साधारणपणे १९७४ हा सुमार असावा. आम्हाला शनिवार-रविवार अशी सुट्टी असे. एक दिवस ते प्रेमाने मला म्हणाले की, 'येणाऱ्या शनिवारी तुम्ही संध्याकाळी गोरेगावला याल का ? मला तुम्हाला काही दाखवायचे आणि काही ऐकायला लावायचे आहे. तुम्ही अशा गोष्टी ऐकण्यासाठी आतुर म्हणून हे निमंत्रण !' ठरल्याप्रमाणे मी शनिवारी गोरेगावला पोहोचलो. माझे मित्र मला एका बारवर घेऊन गेले. इथे मला का आणलंस ? त्यांनी सांगितलं थोडा वेळ थांब. मी एखादा पेग पितो, तू चकणा खात बस. थोड्या वेळात बाजूच्या टेबलवर वयाची साठी ओलांडलेली चार माणसे येऊन बसली. त्यांनी त्यांची मद्याची ऑर्डर दिली. थोड्या वेळाने वेटरने चार ग्लास भरून आणून ठेवले. शेंगदाणे ठेवताना त्याचा हात एका ग्लासला लागला. ग्लास खाली पडला. दारू खाली सांडली. त्या मुलानं काचा गोळा केल्या आणि लादी पुसून घेतली. एका गृहस्थाने त्याला हाक मारली. बाळा पडलेल्या काचा गोळा केल्यास, लादी पुसून घेतलीस. पण फुटलेला ग्लास परत निर्माण करू शकशील का ? खाली सांडलेली दारू परत भरता येईल का ? तो मुलगा फक्त बघत उभा राहिला. त्या गृहस्थाने त्याला सांगितलें, कुठलंही व्यसन करण्यापूर्वी किंवा पूर्वजांनी जे काही चांगल्या संस्काराचे नियम सांगितले आहेत ते विसरण्यापूर्वी आत्ता मी जे काही सांगितलं त्याची फक्त आठवण करायची.

१९७४ सालातली गोष्ट असेल ! मी गावी गेलो होतो. रात्री माझे आई-वडील एका विषयावर बोलत होते. वडील म्हणाले, आता मुलीला वीस वर्षं पुरी होतील. आता तिचं लग्न होणं आवश्यक आहे. काचेची वस्तू ही, चरा पडण्याआधी किंवा फुटण्याआधी योग्य जागेवर जाणे आवश्यक असते. हा विचार माझ्या वडिलांचा होता. तेव्हा मला स्मरण झालं की आजोबा जे म्हणत मुलगी म्हणजे काचेचा पेला ते का ? हे माझ्या त्या क्षणाला लक्षात आलं. काचेचा पेला याचा अर्थ चारित्र्य ! चारित्र्य, शील या गोष्टीला त्या काळात किती महत्त्व होतं हे यावरून लक्षात येईल. वडिलांच्या इच्छेप्रमाणे माझ्या मागच्याबहिणीचं वीस वर्षं पूर्ण होण्या आधीच लग्न झालं. तिचा संसार सुखाचा झाला. आज या सगळ्या गोष्टींची तीव्रतेने आठवण होण्यासाठी कारणही तसंच घडलं. मी माझ्या एका अगदी जवळच्या मित्राच्या घरी गेलो होतो. रात्री जेवायला म्हणून. जेवणं झाली. रात्रीचे अकरा वाजले होते. मी सहज मित्राला विचारलं, अरे तुझं कन्यारत्न कुठे आहे ? वहिनीने उत्तर दिलं, ती तिच्या मित्रमैत्रिणींबरोबर बाहेर गेलेली आहे. रात्री लेट येणार म्हणून सांगितलं आहे. मी माझ्या सवयीप्रमाणे विचारलं, एवढ्या उशिरा रात्री तुम्ही मुलीला मित्रमैत्रिणींबरोबर पाठवता का ? वहिनीने हसत उत्तर दिले, अहो कुठल्या युगात वावरता तुम्ही ? आता वेळेचे नियम वगैरे संपले. मुलगी ज्यावेळी उशिरा परत येण्यासाठी बाहेर जाते, तेव्हा जाताना मी तिला इन्स्ट्रक्शन देते की, बघ बाई मित्रांबरोबर बाहेर जातेस. सगळी नीट काळजी घे. कोणतीही भानगड घरात येता कामा नये. एकदा तुमच्या नावाची बदनामी झाली की लग्नाच्या वेळी काही गोष्टी त्रासदायक ठरतात. वहिनींना काय म्हणायचे, हे माझ्या लक्षात आलं होतं. मी कुठलीही प्रतिक्रिया न देता हसत हसत बाहेर पडलो. घरी आलो. मला आई-वडिलांचं बोलणं, आजोबांचे विचार सगळ्या गोष्टी आठवल्या. क्षणभर मी विचारात पडलो की, वैचारिकदृष्ट्या मी अजून कुठल्या युगात वावरतोय ? काळ झपाट्याने निघून गेला. मी मात्र तिथेच आहे. काळाचा वेग प्रचंड आहे आणि त्या वेगाबरोबर धावण्याची मानवाला जबरदस्त इच्छा आहे. इच्छा असायलाच हवी. पण आपण धावताना, कुठून कुठपर्यंत येऊन पोहोचलो, याचा विचार करण्यासाठी दोन मिनिटं तरी थांबणं आवश्यक असतं. त्यासाठी सिंहावलोकनाची गरज असते. मानव एवढ्या वेगाने धावत आहे की, त्या वेगाच्या वेडात तो शेवटी एका उंच टेकडीवर चढून जाईल. पुढे धावण्यासाठी रस्ता नसेल. दिसेल ती एक अतिशय खोल खोल दरी आणि दरीतच पडून मानवाचा जो धावण्याचा वेग आहे त्याचा नाश होईल.

उत्कर्ष झालाच पाहिजे. संशोधनसुद्धा झालंच पाहिजे. पण हे सगळं करत असताना आपले संस्कार, आपला घरंदाजपणा, आपली सामाजिक जबाबदारी, आपली कर्तव्ये, आपल्या निष्ठा, आपली दैवतं या गोष्टींचा विसर कधीही पडता कामा नये. ते जर तुम्ही लक्षात ठेवलेत तर खोल खोल दरीत पडून मृत्यू येण्याची कुठलीही शक्यता राहणार नाही. हे माझे विचार आहेत. मी ते मनमोकळेपणाने मांडले आहेत. धन्यवाद !

अभिनंदन –

कु. श्रावणी अनिरुद्ध भिडे, पनवेल हिला ऑल इंडिया रेडिओ, आकाशवाणी, मुंबई यांचेकडून 'बी हाय ग्रेड' सुगम संगीत गायिका म्हणून दर्जा प्राप्त झाला. कु. श्रावणीचे भिडे प्रतिष्ठानतर्फे हार्दिक अभिनंदन ! विशेष बाब म्हणजे कु. श्रावणीचे वडील श्री. अनिरुद्ध ह्या दोघांनाही एकाचवेळी असा दर्जा मिळणे हा दुग्धशर्करा योग आहे. तिला पुढील यशासाठी भरभरून आशीर्वाद !



कु. श्रावणी भिडे

अभिनंदन –

संस्कार भारती, कोकण प्रांत सौजन्याने चारोळी स्पर्धेमध्ये श्री. चिंतामणी भिडे, ठाणे (माजी विश्वस्त, भिडे प्रतिष्ठान) यांना प्रथम पारितोषिक मिळाले. भिडे प्रतिष्ठान तर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा !



श्री. चिंतामणी भिडे

एकदा काय झालं... पारायण

– सौ. शिल्पा श्रीकृष्ण भिडे,
पुणे

पूर्वीच्या काळी साधारण १९६० ते १९७५ चा काळ असेल म्हणजे आमचा लहानपणीचा काळ किंबहुना त्याही आधीपासून घरात आजी-आजोबा एकत्रातले घर असेल तर पणजोबा-पंजी, काका-काकू अशी सगळी मंडळी तसेच आई-वडील वर्षभर घरात काही धार्मिक कार्य असायची तसेच चातुर्मास, गणपती-गौरी, नवरात्र तसेच मागशीर्ष महिन्यात दत्तजयंती असायची. त्याप्रमाणे सर्व ज्येष्ठ मंडळी आपापल्या परीने दासबोध, अधिक महिन्यात विष्णुसहस्रनाम, ज्ञानेश्वरीचे, गुरुचरित्राचे महीम्न म्हणा देवी माहात्म्य अशी शक्य तितक्या भक्तीभावाने कोण सप्ताह, मासिक, वार्षिक अशी पारायणे करत असत. पारायण म्हणजे साधे सोपे नाही. प्रात:काळी उठून, शुचिर्भूत होऊन एक वेळ, एक जागा, छान चौरंग, पाट, रांगोळी काढून संकल्प सोडून पारायणे चालायची. ठरलेले दिवस पूर्ण झाले की घरात गोडाधोडाचा स्वयंपाक करून ब्राह्मणाला जेवायला बोलावून साग्रसंगीत जेवणं व्हायची. दक्षिणा दिली जायची असे त्याचे पारणं व्हायचे, अशी सांगता होत असे.

आताचे दिवस पालटले तरी अजून काही घरांतून अशी पारायणे होतात. परंतु आताच्या बाळगोपाळांना शहरात वाढलेल्यांना असे दृश्ये कमी बघायला मिळतात. एकदा काय झालं, आमच्याकडे म्हणजे सध्या खूपशा घरातून आजी-आजोबा असे दोघे राहात असतात. तर माझे दोन नातू उन्हाळी सुट्टीत आमच्याकडे राहायला आले. दोघांना क्रिकेटच्या व पोहायच्या क्लासला घातले. रोजचे रुटीन सुरू झाले. त्याबरोबर शुद्धलेखन, परवचा आणि रामरक्षा, मारुती स्तोत्र असा दिनक्रम ठरला. रोजची जेवणंखाणं चालू होती. त्यातूनच थोडा वेळ मिळाला की आमची परवानगी घेऊन आजी-आजोबांचा मोबाईल घेऊन मंडळी बघत बसायची जशी ब्रह्मानंदी टाळी ! असे रोजचे झाल्यावर मी आपली उपरोधिक स्वरात 'हं बसलात का पारायणाला' असे म्हणल्यावर त्यांना कळायचे नाही. ते दुर्लक्ष करायचे. दोन-चार दिवसांनी त्यांनी मला विचारले, 'आजी तू रोज का असे म्हणतेस ? पारायण म्हणजे काय गं ?' मग त्यांना पूर्वीची पारायणं कशी असायची ते समजावून सांगितले.

आताची पारायणं म्हणजे व्हॉटस्अप, यूट्यूब, इन्स्टाग्राम, ओटीटी, रिल्स ह्यातून आधुनिक प्रकारे चौरस ज्ञान मिळते. अथपासून इतिपर्यंत आणि ह्यात काय शुचिर्भूत व्हायला नको. मनात आले ती कुठेही, कसेही, कधीही, केव्हाही स्थळ काळाचे भान नाही. आडव्याचे उभे (झोपेतून जागे झाल्यावर) अगदी झोपताना सुद्धा, एकत्र सगळे असले तरी प्रत्येकाची पारायणे चालू असतात. अगदी मेट्रोमध्ये सुद्धा प्रत्येक माणूस मोबाईलमध्ये डोके घालून बसतो. अगदी वृद्ध व्यक्ती सुद्धा ! शेवटी असे वाटते की वाचन प्रकार हळूहळू मागे पडणार का ? आताची पिढी असे पण म्हणेल, ह्या सगळ्या माध्यमातून आम्हाला जगातले पूर्ण ज्ञान मिळते. ह्यातून पूर्वीची पारायणं आणि आधुनिक पारायणं अशी दोन पिढ्यांमधली दरी जाणवते व म्हणावेसे वाटते, 'कालाय तस्मै नम:।'

माभळे, संगमेश्वर येथील १९२ वर्षे जुना गणपती

संगमेश्वर जवळील माभळे येथील प्रभाकर नारायण भिडे यांच्या श्री गणपती मंदिराला १९२ वर्षांचा इतिहास आहे. आत्ता श्री गणपती मंदिराची देखभाल करत असलेले प्रभाकर यांची ही पाचवी पिढी आहे. सदरचे मंदिर हे भिडे यांचे घराशेजारील जागेवर खाजगी मंदिर आहे. आज काळानुरूप देवळाची रचना बदलली आहे. या मंदिराची स्थापना कै. गंगाधरराव भिडे यांनी छोटीशी घुमटी बांधून केली. त्यानंतर त्यांच्या पुढच्या पिढ्या म्हणजेच कै. सदाशिवराव, कै. पुरुषोत्तमराव व कै. नारायणराव यांनी अखंड श्री गणेशाची सेवा केली, करत आहेत. आज प्रभाकरपंत यांची पाचवी पिढीही हे काम करत आहे. प्रभाकरपंत यांना दोन चिरंजीव – प्रकाश व चारुदत्त. यापैकी प्रकाश हे आपले कुटुंब सौ. मृणाल व कन्या कु. वरदा यांच्यासह डोंबिवली येथे पौरोहित्य व्यवसायात असून दुसरे चिरंजीव चारुदत्त बँकेत नोकरीला आहेत. आपली नोकरी सांभाळून चारुदत्त व त्यांचे चिरंजीव अक्षय हेही श्री गणेश सेवेची धुरा यशस्वीपणे सांभाळत आहेत. दरवर्षी श्री गणेश चतुर्थीला उत्सव गौरी गणपती विसर्जनापर्यंत साजरा केला जातो. याबरोबरच या मंदिरात गौरी पूजनादिवशी (हवसतात त्यादिवशी) गावातील महिला भगिनींसाठी हळदी-कुंकू कार्यक्रम आयोजित केला जातो. तसेच या दिवशी दर्शनासाठी येणाऱ्या माता भगिनी मंगळागौरीतील खेळ खेळून साजरा करतात. या मंदिराविषयी अधिक माहिती सांगताना प्रभाकरपंत यांनी सांगितले की, मंदिर स्थापन केले तेव्हा छोटीशीच घुमटी होती. जी काही काळानंतर सुधारून मंदिर स्वरूपात आणली. भिडे स्वतः एस.टी.मध्ये कामाला होते. परंतु नोकरी सांभाळून सेवेत कधीही खंड पडू दिला नाही. अनेक वेळा संकष्टी चतुर्थीला, गणेशोत्सवात सहस्रावर्तने, एकादशणी असे कार्यक्रम घडले आहेत. देऊळ जरी खाजगी असले तरीही वर्षभर प्रभाकरपंत यांची मित्रमंडळी व गावातील सर्वच प्रत्येक कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग घेत असतात. मंदिराचा जीर्णोद्धार करतेवेळीही भिडे यांच्या हितचिंतक, आप्तेष्ट, मित्रमंडळींनी यथायोग्य सढळ हस्ते मदत केली आहे. आत्ता बांधलेल्या देवळामध्ये श्री गणपती व्यतिरिक्त श्री शिवशंकर, श्री. हनुमान, श्री संतोषीमाता, श्री दत्त अशा एकूण पाच देवीदेवतांची स्थापना केली आहे. आज देवळाची रचना बदलल्यावर एखादा छोटेखानी कार्यक्रम होऊ शकेल एवढी जागा उपलब्ध झाली आहे.

(माहिती संकलन : दत्तात्रय विनायक गोगटे, रत्नागिरी)

कविता

श्रद्धा

असंख्य मंदिरे, हजारो देवदेवता आहेत,
तरीही तरुण मंडळी म्हणतात, देव आहे ?
श्रद्धा ठेवा, आजही तुमचे प्रारब्ध बदलते,
सातत्याने साधना करा, चित्त शुद्ध होते !
आजचे प्रश्न गुंतागुंतीचे, सोडवणे सोपे नाही
कारण समजून घ्यायला, वेळ लागतो पाही,
अनेक उत्तरे योग्य वाटतात, प्रश्न सुटत नाही,
खूप संयम लागतो, करू नकाच घाई !
सारे मनासारखे हवे, हा खुळा हट्ट सोडा,
प्रश्न आहे, त्यात तुमचाही वाटा, ठरलेला,
खूप गांभीर्याने जरा बघा, जगण्याकडे,
एकटे एकटे जगणे, मन विषण्ण हेच कोडे ?
यासाठी काय झालेला हा तुमचा जन्म,
आयुष्य म्हणजे खेळ नाही, समजून करा कर्म,
चारही पुरुषार्थ येथे, समजून हे घ्यावे जरा,
माझा मार्ग, माझे कर्म, याचा परिणाम होतो खरा !
जगणे आनंदी हवे तर, वेडा हट्ट सोडून द्या,
स्वीकार करा जे जे आहे, थोडा थोडा त्याग करा,
प्रेमासाठी बरेच काही, समजून घ्यावे लागते,
ज्यांना प्रेम कळले, त्यांनाच जगावे वाटते !!!
– हेमंत भिडे, जळगाव

वटपौर्णिमा

पतीचे व्यक्तिमत्त्व, असे वटवृक्षा समान
पत्नी सहज घेई त्यास, स्वतःत सामावून
प्रेम, सेवा नि समर्पण संसारी पूर्ण वाहून
म्हणून वटवृक्षाहून ठरते सावित्री महान !
ऊन, वारा, पाऊस सोसून पावलोपावली
वटवृक्ष देतो प्राणवायू अन् शीतल सावली
प्रेमळ धागा बांधून प्रेमे पूजिते ती माउली
रक्षाया पतीचे प्राण यमा समोर उभी ठाकली !
अहो बदलला काळ, बदलली रीती युगांतरी
सर्व क्षेत्रे करिते पादाक्रांत, अवकाशी वारी
व्रते नको टीका, समजून घ्या की जरा तरी
भाव परी तेच आधुनिक सावित्रीच्या अंतरी !
– श्री. कांचन भिडे, (भावकांचन), पनवेल

मेघ

मेघ उतरले धरणी वरती
पाऊस धारा आल्या।
झाडे ओली, वेली ओल्या
पावसात न्हाल्या
धरणीच्या कुशीतली
बीजे जागी झाली।
नाजूक पाने, नाजूक अंकुर
धरणी हिरवी झाली
पाणी साचे जिकडे तिकडे
लाली त्याला आली।
मला वाटते वसुंधरा
लाजेने लाल झाली !
– सौ. अनघा भिडे, अलिबाग

सुख

सुप्रभाती घरातल्या
खिडकीमधुनी प्राजक्ताचा
गंध दरवळे,
ह्यालाच सुख म्हणती।
सुप्रभाती घरातल्या
खिडकीमधुनी कोकिळेचे
दर्शन होई,
ह्यालाच सुख म्हणती ।
सुप्रभाती घरातल्या
खिडकीमधुनी हरहुन्नरी
पक्ष्यांची किलबिल ऐकू येई,
ह्यालाच सुख म्हणती।
सुप्रभाती घरातल्या
खिडकीमधुनी शंखनाद ऐकू येई
ह्यालाच सुख म्हणती।
सुख म्हणजे दुसरे काय आहे
ते तर मानले तर आहे !
– सौ. शिल्पा भिडे, पुणे

जीवन सारथ्य

बरेच जण विचारतात,
निवृत्तीनंतर कसं चाललंय ?
काही काही हातून निसटलंय,
बरंच काही नवीन गवसलंय.
नव कल्पनांचं स्वप्न डोळ्यात तरळतंय
विचारांच्या पंखांना क्षितीज खुणावतंय
अंतरीच्या डोहातील सत्य सांगतंय
आपले सारथ्य आपणच करायचंय
कर्माच्या मार्गावर चालत राहायचंय
सहज सुंदरतेनं आयुष्य जगायचंय
– श्री. जयराम भिडे, सांगली

बाहुले आम्ही असे...

बाहुल्यांचा खेळ मी पाहून हसलो,
एक मीही त्यातला बाहुला होऊन फसलो।
आज माझ्या संगतीला बाहुले अब्जावधी,
थोडके नेते खिलाडी खेळणे त्यांचेच बनलो।
हार जिती रंगती काटती कोणी कुणा,
खेळ त्यांचा जीवघेणा, खेळ तो पाहून विटलो।
बाहुल्यांची किल्ली त्यांच्या हाती आहे तोवरी,
जगत मी आहे बिचारा, प्राण सोडूही शकलो।
कान, डोळे बंद आमुचे, वागवित आम्हा कसेही,
हाल वा हलाल होता, भावना गमावून जगलो।
मारुनी मन सर्वदा, वाढता वय मीही वठलो
शाप हा निर्जीवतेचा, मी असा भोगीत बसलो !
– डॉ. प्रतिभा भिडे, ठाणे

आम्ही भिडे अंकास हार्दिक शुभेच्छा !!

Bhide & Associates

Retainership of GST - Registration, Returns, Audit, Consultany & Other Allied Services

Plot No. 7, 1st floor, Nagesh Banglow, Shahupuri Road,
Koteshwar Colony, Satara - 415002.
Email : psbexconsult@gmail.com

Reg.off. : F.No.6, Devika Appt., 15/1, Vyankatpura Peth,
Satara - 415 002.

Shriram A. Kulkarni
Cell : 9881237931, 7038790066

Prashant S. Bhide
Cell : 9423035027, 7776027779

योग्य जोडीदार शोधताय?
चित्पावन मित्र असोसिएशन, पुणे संचलित
मराठी ब्राह्मण विवाह वेबसाईट
soyrikpune.com



नाव नोंदणी, स्थळे पहाणे सर्व ऑनलाईन
वार्षिक फी रु. १,५०० फक्त
विश्वनाथ भिडे,98508 20709
सुधीर उत्तुरकर, 97309, 55309

पत्ता चुकीचा असल्यास अंक खालील पत्त्यावर परत पाठवावेत...
नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान, द्वारा : ले. क. सुनिल वासुदेव भिडे,
१४२६, सदाशिव पेठ, नीलसदन ए-२०१,
पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०

सायंदैनिक प्राजक्त

'प्राजक्त' हे पत्र मुद्रक सौ. विनीता प्रफुल्ल डबीर यांनी प्रकाशक व मालक श्री. प्रफुल्ल गणेश डबीर यांचेसाठी प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड, कोल्हापूर-४१६०१२ येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. संपादक : प्रफुल्ल डबीर फोन २५४०४२७

RNI NO. : M-6 (1457) / 70-RNI
Reg. No. KLR 136/24-26 Posted in Kolhapur RMS